महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ९२ वा | दिनांक : ०६/०१/२०२५ | वार : सोमवार

## तुम्ही मला मते दिली म्हणजे सालगडी केलंय का? उपमुख्यमंत्री अजित पवार



**बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार कार्यकर्त्यावर भडकल्याचे पाहायला मिळाले. बारामतीमध्ये एका कार्यक्रमानंतर कार्यकर्त्यांनी अजित पवारांची भेट घेत, त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी कार्यकर्त्यांनी अनेक कामे झाले नसल्याचे म्हटल्यानंतर अजित पवार त्यांच्यावर चांगलेच संतापले. तुम्ही मला मते दिली म्हणजे माझे मालक नाही झालात, अशा शब्दांत अजित पवारांनी सुनावले. दरम्यान, या प्रकारानंतर मंत्री संजय शिरसाट यांनी अजित पवारांची पाठराखण केली आहे.

हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर अजित पवार परदेश दौऱ्यावर गेले होते, असे म्हटले जात आहे. परदेश दौऱ्यावरून परतल्यानंतर अजित पवार विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यासाठी बारामतीला गेले होते. यावेळी बारामतीमधील मेडद येथील तालुका खरेदी विक्री संघाच्या परिसरात एका नवीन पेट्रोल पंपाचे उद्घाटन अजित पवारांच्या हस्ते पार पडले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना अजित पवार भडकल्याचे पाहायला मिळाले.

बारामती तालुका संघाच्या परिसरातील एका पेट्रोल पंपाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमात अजित पवार बोलत होते. यावेळी नागरिक त्यांना कामाच्या संदर्भातील निवेदन देत होते. अजित पवारही ती निवेदने घेत कामे मार्गी लावण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देत होते. मात्र, याचवेळी एका कार्यकर्त्याने अनेक कामे झाले नसल्याचे म्हटले. त्या कार्यकर्त्याच्या वक्तव्यानंतर इतर काही नागरिकांनीही तीच री ओढली. यानंतर मात्र, अजित पवार यांनी 'अरे तुम्ही मला मते दिली म्हणजे माझे मालक नाही झालात. मला सालगडी केलंय का?', असा सवाल करत त्या कार्यकर्त्यावर संताप व्यक्त केला.

अजित पवारांच्या या संतापावर मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया दिली आहे. काही वेळेला असे होते की, लोकप्रतिनिधी काम करत असताना काही मतदार देखील तारतम्य न ठेवता थेट हे काम झालेच पाहिजे, असा आग्रह करतात. त्यावेळेला एखाद्यावर रागावणे हे सहाजिक आहे, असे म्हणत संजय शिरसाट यांनी अजित पवारांची पाठराखण केली. एखादा लोकप्रतिनिधी उलट बोलला तर त्याची बातमी होते. पण एखादा नागरिक बोलला तर त्याची बातमी होत नाही. कदाचित अजित पवार यांनी रागाच्या भरात ते वक्तव्य केले असावे, असेही शिरसाट म्हणाले.

## मनोज जरांगेविरोधात धनंजय मुंडे समर्थक आक्रमक



**बीड :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी विरोधक आक्रमक झाले आहेत. आधी बीड, मग परभणी आणि आज पुण्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चांमध्ये आरोपींनी फाशीची शिक्षा देण्यासह मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे समर्थकांकडून बीड आणि परळी शहर पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. मनोज जरांगे आणि अंजली दमानिया यांच्या गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. या मागणीचे निवेदन पोलिस प्रशासनाला देण्यात आले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि भाजप आमदार सुरेश धस हे धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. अंजली दमानिया आणि सुरेश धस यांच्याकडून संतोष देशमुख हत्याप्रकरणात धनंजय मुंडेबाबत वेगवेगळे दावे आणि आरोप होत आहेत. त्यामुळे आज मुंडे समर्थकांनी बीड आणि परळी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडला. तसेच मनोज जरांगे हे जातीयवाद करत असल्याचा आरोप केला. सोबतच 'जातीयवादी मनोज जरांगेचे करायचे काय? खाली डोकं वर पाय', अशी घोषणाबाजी करण्यात आली.

परभणीच्या मोर्चात धनंजय मुंडे आणि मुंडे कुटुंबीय यांच्या विशिष्ट जातीवर आणि बीड जिल्ह्यात घुसून मारण्याची जी भाषा झाली, त्याचा जाहीर निषेध करण्यासाठी इथे जमलेले आहोत. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला फाशी झालीच पाहिजे, ही भूमिका धनंजय मुंडे यांची आहेत. त्यांच्यासोबतच बीड जिल्ह्याची देखील तीच भूमिका आहे, असे आंदोलकांनी सांगितले.

संतोष देशमुख हत्याकांडच्या आडून जातीचे विष पेरले जात आहे, जाती-जातीत भांडणे लावायचे काम सुरू आहे. या प्रकरणाचे राजकारण होत आहे. या सर्व प्रकाराचा निषेध करण्यासाठी आम्ही इथे जमलो आहोत. संतोष देशमुखांच्या हत्येचे समर्थन कुणीही केलेले नाही.

राज्यभरात सुरू असलेले आक्रोश मोर्चे देशमुखांच्या मारेकऱ्यांविरोधात असावेत, मात्र, त्या मोर्चांमध्ये धनंजय मुंडे आणि विशिष्ट जातीला किंवा ओबीसीला टार्गेट केले जात आहे, असा आरोप आंदोलकांनी केला. ही भूमिका महाराष्ट्रात असंवैधानिक आहे. ज्यांनी जातीवादी, महाराष्ट्राचे वातावरण बिघडवण्याचे शब्द वापरले, अशा मनोज जरांगे, अंजली दमानिया यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी निवेदनाद्वारे पोलिस प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

## शिक्षणात खासगीकरण योग्य नाही - राहुल गांधी



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आयआयटी मद्रासच्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. एका विद्यार्थ्यासोबतच्या संभाषणाचा व्हिडिओ ट्विटरवर शेअर करताना राहुल गांधींनी लिहिले - सरकारांनी शिक्षण क्षेत्रात खर्च वाढवला पाहिजे. खासगीकरण आणि आर्थिक मदतीतून दर्जेदार शिक्षण मिळू शकत नाही.

एका विद्यार्थ्याने राहुल यांना विचारले की काँग्रेस आणि भाजपच्या कार्यपद्धतीत काय फरक आहे. यावर राहुल म्हणाले- काँग्रेस आणि यूपीएचा असा विश्वास आहे की संसाधने सर्वांमध्ये न्याय्य पद्धतीने वाटली पाहिजेत. विकास सर्वांसाठी समान असावा. यातून समाजातील कोणताही घटक वगळू नये.

त्याचवेळी भाजपचे लोक विकासाबाबत अधिक आक्रमक आहेत. संसाधनांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. ते त्याला आर्थिक भाषेत ट्रिकल डाउन म्हणतात. सामाजिक बाबींवर काँग्रेसचा विश्वास आहे की समाज जितका सामंजस्यपूर्ण असेल. लोक कमी लढतील.

राहुल: तुम्ही यशाची व्याख्या कशी करता?

विद्यार्थी: ही यात्रा आहे. यामध्ये कोणताही अडथळा नसतो. एका शब्दात उत्तर म्हणजे आनंद.

राहुल : माझ्या मते, जो आपल्या आजूबाजूचे वातावरण योग्य प्रकारे पाहतो तेच यश आहे. भीतीचा सामना करणे. लालसा समजून घेणे. माझ्या दृष्टीने हे यश आहे.

विद्यार्थी: १० वर्षांपूर्वी देश कशावर अधिक लक्ष केंद्रित करत होता?

राहुल: काँग्रेस आणि यूपीएचा असा विश्वास आहे की संसाधनांचे वितरण न्याय्यपणे केले पाहिजे. विकास सर्वांसाठी समान असावा. यातून समाजातील कोणताही घटक वगळू नये. भाजपचे लोक विकासाबाबत अधिक आक्रमक आहेत. संसाधनांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. ते त्याला आर्थिक भाषेत ट्रिकल डाउन म्हणतात. सामाजिक बाबींवर काँग्रेसचा विश्वास आहे की समाज जितका सामंजस्यपूर्ण असेल. लोक तितके कमी लढतील.

विद्यार्थी: जागतिक अशांततेबद्दल तुम्हाला काय वाटते?

राहुल : चीन आणि अमेरिका यांच्यातील संघर्षात भारताची वाटचाल कशी आणि कुठे आहे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. अमेरिका आणि चीनच्या योजनांमध्ये भारताचे काय होणार आहे? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. जेव्हा दोन शक्ती एकमेकांसमोर असतात तेव्हा समतोल निर्माण करण्याची क्षमता भारताकडे आहे. भारत अशा ठिकाणी आहे जिथे तो आपल्या शक्तीपेक्षा कितीतरी जास्त साध्य करू शकतो. या परिस्थितीत भारत पुढे जाऊ शकला तर त्याचा फायदा आपल्याला होईल.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ जानेवारी २०२५

# खंडणीसाठी धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर बैठक : सुरेश धस

**पुणे** : संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ बीड आणि परभणीनंतर आज पुण्यामध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात भाजप आमदार सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत मोठा दावा केला आहे. पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यासाठी धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर बैठक झाली होती. नंतर निवडणुकीसाठी या कंपनीकडून ५० लाख रुपये घेण्यात आले, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला. तसेच ही माहिती खोटी निघाली, तर मी राजकारण सोडेन, असे आव्हानही धस यांनी दिले.

मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास आणि आरोपींना कठोर शिक्षेच्या मागणीसाठी राज्यात मोर्चे काढले जात आहे. आज पुण्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चावेळी केलेल्या भाषणात बोलताना सुरेश धस यांनी उपरोक्त दावा केला. हा दावा करताना सुरेश धस यांनी तारखांचा देखील उल्लेख केला. तसेच धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून बाहेर काढावे, अशी मागणी देखील सुरेश धस यांनी यावेळी केली.

१४ जून रोजी अवादा कंपनीचे अधिकारी आणि वाल्मीक कराड, नितीन बिक्कड यांची मुंडेंच्या परळीतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीनंतर थेट धनंजय मुंडे यांची भेट घेण्यासाठी अवादा कंपनीच्या शुक्ला नावाचा अधिकारी मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्याकडे प्रयत्न करत होते. मला डावलून थेट धनंजय मुंडेंची भेट घेण्याचा प्रयत्न केल्याने ही बाब वाल्मीक कराडला खटकली. त्यामुळे वाल्मीकने जोशीला खडसावले.

त्यानंतर १९ जून रोजी आवादा कंपनी आणि आय एनर्जी या कंपनीच्या अधिकाऱ्यांची धनंजय मुंडे यांच्या मुंबईतील बंगल्यावर बैठक झाली. या बैठकीत कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे ३ कोटी रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना ही बाब फोनवर सांगितली. वरिष्ठांनी ३ कोटींऐवजी २ कोटी रुपये देण्याची सहमती दाखवली. त्यानंतर निवडणुकीसाठी आता लगेच ५० लाख रुपये द्या, अशी मागणी कंपनीकडे करण्यात आली आणि कंपनीने यांना ५० लाख रुपये दिले. हे पैसे तेव्हा धनंजय मुंडेंनी घेतले की वाल्मीक कराड याने हे मला माहीत नाही. धनंजय मुंडे यांच्या सरकारी बंगल्यावर खंडणीसाठी बैठका झाल्या, असा गंभीर आरोप सुरेश धस यांनी केला आहे.

सुरेश धस यांनी यावेळी अजित पवारांचे कौतुक करत त्यांच्याकडे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली. अजित दादा तुमचं यांच्याकडे काय अडकले आहे. यांना बाहेर जाऊ दे, अरे बाबा सातपुडा सरकारी बंगल्यावर बैठका घेत असतील आणि ही बैठक जर चुकीची निघाली, तर मी चॅलेंज देतो. राजकारण सोडून देईल, असे आव्हान धस यांनी दिले. मी राजकारणात राहणार नाही, पण अजित पवार, एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्ही सर्वांनी मिळून या गोष्टीचा छडा लावा, अशी मागणी धस यांनी केली. या गोष्टी जर खऱ्या असतील तर काही दिवस जोपर्यंत या केसचा निकाल लागत नाही, तोपर्यंत त्याला बाहेर काढा. आमची मागणी आहे. सरकारच्या बाहेर त्यांना ठेवा. त्यांच्याकडून राजीनामा घ्यायचा नसेल तर त्यांना बिन खात्याचा मंत्री करा. सगळ्यात सोपं राजीनामा द्यायला सांगा, असेही सुरेश धस म्हणाले.

## मुलीला एकदा फॉलो करणे गुन्हा नाही- मुंबई हायकोर्ट

**मुंबई** : मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, मुलीला एकदा फॉलो करणे हे आयपीसीच्या कलम ३५४(डी) अंतर्गत पाठलाग करण्यासारखे नाही. कायदेशीररित्या, सतत एखाद्याचे अनुसरण करणे हा गुन्हा मानला जाईल.

लैंगिक छळाच्या दोन १९ वर्षीय आरोपींच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती जीए सानप यांनी हा निर्णय दिला. दोघांवर १४ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिच्या घरात जबरदस्तीने घुसल्याचा आरोप होता. न्यायमूर्ती सानप म्हणाले की, मुलीच्या मागे लागण्याची एकच घटना आयपीसी अंतर्गत गुन्हा मानता येणार नाही.

हे प्रकरण जानेवारी २०२० चे आहे, जेव्हा मुख्य आरोपीने अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली होती. मुलीने नकार दिल्यानंतरही आरोपीने मान्य केले नाही. मुलीच्या आईने याबाबत मुलाच्या कुटुंबीयांशी बोलल्यानंतरही आरोपीने मुलीचा छळ सुरूच ठेवला.

२६ ऑगस्ट २०२० रोजी आरोपीने मुलीच्या घरात घुसून तिचा चेहरा दाबून तिला अयोग्यरित्या स्पर्श केला. यावेळी दुसऱ्या आरोपीने घराबाहेर पहारा ठेवला. ट्रायल कोर्टाने दोन्ही आरोपींविरुद्ध आयपीसी आणि पॉक्सो कायद्यांतर्गत अनेक गुन्हे दाखल केले. यामध्ये पाठलाग करणे, लैंगिक छळ करणे, जबरदस्तीने प्रवेश करणे आणि गुन्हेगारी धमकी देणे यांचा समावेश आहे.

या प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने सांगितले की, आरोपींनी मुलीचा नदीपर्यंत पाठलाग केल्यावर केवळ एका घटनेच्या आधारे मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायमूर्ती सानप यांनी स्पष्ट केले की कलम ३५४ (डी) नुसार आरोपीने पीडितेचा सतत पाठपुरावा केला असावा, तिला सतत पाहिले असेल किंवा शारीरिक किंवा डिजिटल माध्यमातून तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

न्यायालयाने दुसऱ्या आरोपीला सर्व आरोपातून निर्दोष मुक्त केले आणि सांगितले की त्याने घराबाहेर पहारा देण्याशिवाय काहीही केले नाही. यासह, न्यायालयाने मुख्य आरोपीला आयपीसीच्या कलम ३५४ (ए) आणि पॉक्सोच्या कलम ८ अंतर्गत दोषी ठरवले. मात्र, उच्च न्यायालयाने मुख्य आरोपीची शिक्षा कमी केली. तो तरुण होता आणि त्याने आधीच अडीच वर्षे कोठडी भोगली होती, असे न्यायालयाने यामागे कारण दिले.

## 'गुटेनबर्गच्या सावल्या' मधील प्रकाशक महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी : कुलगुरु माणिकराव साळुंखे




प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांच्या ' गुटेनबर्ग च्या सावल्या ' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. आर.व्ही. कुलकर्णी व प्रकाशिका भाग्यश्री पाटील कासोटे

**नाशिक** : 'गुटेनबर्ग'च्या सावल्या' या पुस्तकातून प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी राज्यातील आणि देशातील महिला प्रकाशकांच्या कार्यकर्तुत्वाचा, त्यांच्या योगदानाचा व संघर्षाचा घेतलेला वेध प्रेरणादायी आहे. यामुळे परंपरागत पुरुषी समजल्या जाणाऱ्या या क्षेत्रातही स्त्रिया आपला वेगळा ठसा उमटवू शकतात, हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे आज स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करू शकतात, मात्र त्यांना समाजाने संधी द्यायला हवी, असे प्रतिपादन माजी कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.येथील यशंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी लिहिलेल्या 'गुटेनबर्गच्या सावल्या' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा कमला महाविद्यालय, कोल्हापूर येथे संपन्न झाला. याप्रसंगी प्रा. डॉ. साळुंखे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्राध्यापक व जेष्ठ समीक्षक डॉ.रणधीर शिंदे, मुक्त विद्यापीठाचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ.आर. व्ही.कुलकर्णी व भाग्यश्री प्रकाशनाच्या प्रकाशिका भाग्यश्री पाटील-कासोटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुस्तक लेखनामागची भूमिका लेखक प्रा.डॉ.प्रवीण घोडेस्वार यांनी मांडली. पुस्तकाबद्दल बोलताना जेष्ठ समीक्षक, प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, 'लेखकाने निवडलेला विषय अत्यंत वेगळा आहे. प्रकाशक म्हणून सांस्कृतिक क्षेत्रात आपली नाममुद्रा उमटविणाऱ्या तेवीस प्रकाशिका यांच्या वाटचालीचा विस्तृत आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. खडतर प्रवास करत कर्तुत्वाचा आलेख उंचावत नेणाऱ्या प्रवासाची नोंद या पुस्तकात आहे. पुरुषसत्ताक समाजात स्त्रियांच्या कामगिरीची दाखल अपवादाने घेण्यात येते. प्रगतीशील विचार समाजापर्यंत पोहोचावेत अशी या स्त्रियांची भूमिका दिसून येते. पुस्तक प्रकाशक यांच्यावर संस्कृतीला पुढे घेऊन जाण्याची मोठी जबाबदारी असते. या विषयावरील हे मराठीतील कदाचित पहिले पुस्तक असावे !" अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, सावित्रीबाई फुले यांना स्त्री शिक्षणासाठी खूप त्रास झाला पण आज अनेक सावित्रीच्या लेकी आपला ठसा प्रत्येक क्षेत्रात उमटवत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ . सुजयकुमार पाटील यांनी केले. तर आभार भाग्यश्री पाटील कासोटे यांनी मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०६ जानेवारी २०२५


## पहिले फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलन थायलंड येथे ७ जानेवारी रोजी




**छ.संभाजीनगर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद, पटाया इंडियन असोसिएशन बँकॉक, सोनवणे फाऊंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विदयमाने पहिले फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलन थायलंड येथे दि.७ जाने. ते १० जाने.२०२५ या कालावधीत अयोजित करण्यात आले आहे.या संमेलनाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ ऋषीकेश कांबळे सर (ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत) हे आहेत तर उद्घाटन प्रा. फ्रापलाड सोरावित अफिपन्यो (चुगलोगकॉर्न राजा विद्यालय विद्यापीठ थायलंड) तर प्रमुख पाहुणे डॉ. राहुल म्हस्केसर,(सचिव सिल्लोड शिक्षण संस्था, औरंगाबाद) डॉ.युवराज धबडगे, (सचिव डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद)डॉ भगवान कांबळे सर (प्राचार्य,शासकीय महाविद्यालयऔरंगाबाद) हे राहतील संमेलनाची भूमिका डॉ. मोहन सौंदर्य (अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद) हे व्यक्त करतील कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ बाळासाहेब लिहिणार मांडतील. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष सुरेश राठी हे आहेत.

दि.८ जाने २०२५ रोजी परिसंवाद १ 'फुले शाहू आंबेडकरी विचाराचे सूत्र': बौद्ध तत्वज्ञानात. या परिसंवादाचे अध्यक्ष. प्राचार्य. आश्रु जाधव तर प्रमुख वक्ते डॉ. प्रवीण कनकुटे,डॉ भगवान कांबळे, डॉ प्रशांतकुमार वनंजे यानंतर 'रमाई 'एकपात्र नाटक मा. प्रतिभा आहेर (सिने अभिनेत्री )या सादर करतील. यानंतर मानवी कल्याणाचे सूत्र: पाली भाषेत. या परिसंवादाचे अध्यक्ष .प्राचार्य माधव गादेकर सर तर प्रमुख वक्ते डॉ. अरुण कोळी, डॉ. शंकर वाघमारे, डॉ. मिलिंद ठोकळे ,डॉ. युवराज धबडगे, प्रा. मोहन सौंदर्य प्रा. वर्षा गायगोले यानंतर कवी संमेलन होईल या कवी संमेलनाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब लिहिणार (प्राचार्य तथा उपाध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद) तर प्रमुख कवी डॉ. बाळासाहेब गायकवाड उषा सरदार, पुष्पा बगाडे, प्राचार्य हसन इनामदार, अरुण कोळी, मिलिंद ठोकळे, सुरेखाताई रत्नपारखी, करुणा जाधव. प्रतिभा आहेर. कार्यक्रमाचा समारोप डॉ ऋषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली होईल यावेळी प्रमुख पाहुणे डॉ भगवान कांबळे, ऋतिक गायकवाड राहतील. यानंतर दिलीप वाघ( सिने अभिनेता )यांचा एक पात्री नाट्यप्रयोग होईल कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीतांनी करण्यात येईल.

## भाजप युवामोर्चा जिल्हा उपाध्यक्ष पदी गणेश नागरे



**कन्नड (अरुण थोरात) :** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा संभाजीनगर दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष सोशल मिडीया प्रभारी पदी गणेश मच्छिंद्र नागरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे, भारतीय जतना युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष, संजय खंबायते यांच्या मान्यतेने भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष व प्रभारी सोशल मीडिया पदाची जबाबदारी देण्यात आली.

यावेळी नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.याबद्दल त्यांचे भाजप कन्नड तालुकाध्यक्ष किशोर आबा पवार, जिल्हा पदाधिकारी सुभाष काळे, गणेश घुगे, कैलास जाधव, सुदाम पवार, आदिंनी अभिनंदन केले आहे.






## श्री महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिर लातूर येथे कब-बुलबुल खरी कमाई उद्घाटन सोहळा संपन्न






**लातूर :** शहरातील श्री महात्मा बसवेश्वर प्रा.वि. येथे नुकताच खरी कमाई उद्घाटन सोहळासंपन्न झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.पुरी मॅडम होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर भारत स्काऊट आणि गाईडचे जिल्हा संघटक श्री. डॉ. शंकर चामे सर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडेन पॉवेल व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करूनकरण्यात आले.या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या वतीने स्टॉल लावण्यात आले होते, यासाठी कब मास्टर वफ्लॉक लीडरने दिलेल्या सूचनेनुसार कब बुलबुल यांनी विविध खाद्यपदार्थ बनवून त्यांचीमांडणी केली होती.यावेळी पालकांनी तसेच शिक्षकांनी स्टॉलला भेट देऊन पदार्थाचा आस्वादघेतला असता, कब- बुलबुल यांच्या चेहऱ्यावर खरी कमाईचा आनंद दिसून येत होता.

यावेळी विभाग प्रमुख श्री मेहत्रे के.एच. सर यांनी प्रास्ताविक व संचलन सादर केले. ज्येष्ठ फ्लॉक लीडर सौ. साखरे मॅडम व कबमास्टर श्री देशमुख सर यांनी मनोगत व्यक्त केले तर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले लातूर भारत स्काऊट आणि गाईडचे जिल्हा संघटक श्री. डॉ शंकर चामे सर यांनीकब-बुलबुल यांना खरी कमाईचे उद्दिष्ट सांगून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मु अ. सौ पुरी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील कब-बुलबुल विभाग प्रमुख कबमास्टर श्री काशिनाथ मेहत्रे सर, कबमास्टर श्री कलमे सर, कबमास्टर श्री देशमुख सर,कबमास्टर श्री उपासे सर तसेचफ्लॉक लिडर सौ साखरे मॅडम, सौ माने मॅडम, सौ दुडिले मॅडम व सौ मुंडे मॅडम तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.